# मराठी विभाग अहवाल २०२२- २३

शैक्षणिक वर्ष २०२२ – २३ मध्ये मराठी विभागात पदवीस्तरावर (द्वितीय व तृतीय वर्षात) ८१ तर पदव्युत्तर स्तरावर २३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तसेच मराठी विभागातील पीच.डी. संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत. या शैक्षणिक वर्षात मराठी विभाग व मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे अहवाल खालीलप्रमाणे आहेत.

**पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम -**

दि. १७.८.२०२२ रोजी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब यांच्या हस्ते वाचनसंस्कृतीच्या प्रचार व प्रसारासाठी प्रथम वर्ष कला व प्रथम वर्ष वाणिज्य विभागातील सुमारे१०० विद्यार्थ्यांना डॉ. संजय शिंदे यांच्या सौजन्यानेपाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. या वेळी संचालक मा.हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी पुस्तकांच्या वाचनातून ज्ञानात भर पडत असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैचारिक समृद्धीसाठी अवांतर वाचन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या देवाणघेवाणीतून ज्ञानाचा प्रसार करावा वाचनसंस्कृती जोपासावी. महाविद्यालयात अक्षर वाङ्याची आवड असणारे अधिकाधिक विद्यार्थी घडावेत यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

**डॉ. शिवाजी एंडाईत यांचे व्याख्यान-**

दि. ११/१०/२०२२ रोजी 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी एंडाईत (कला व वाणिज्य महाविद्यालय,चाकण) यांचे 'वाचनसंस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. शिवाजी एंडाईत म्हणाले की, वाचन संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथालयातील वाचनसाहित्याची सुजाण वाचकांशी नियमित गाठभेट होत राहायला हवी. त्यातूनच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होईल.

**'मला प्रभावित करून गेलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धा -**

दि. ११.१०.२०२२ रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'मला प्रभावित करून गेलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक अपेक्षा कर्वे (माती, पंख आणि आकाश - ज्ञानेश्वर मुळे), द्वितीय क्रमांक ऋषिकेश काची (पाणी पाणी - लक्ष्मीकांत देशमुख), तृतीय क्रमांक स्नेहल देवदरे(श्यामची आई- साने गुरुजी) यांचा आला.

**दिवाळी अंक भेट कार्यक्रम -**

दि. १२.१०.२०२२रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना साधना साप्ताहिकाचा युवा व बालकुमार दिवाळी अंक भेटदेण्यात आला. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. या प्रसंगी मार्गदर्शन करताना उपाध्यक्ष मा.नानासाहेब टाकळकर यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक धारणा व सामाजिक जाणिवा प्रगल्भ होण्यासाठी वाचन आवश्यक असून दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचन परंपरेचे जतन करण्याचे आवाहन केले. या वेळी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांसह अपेक्षा कर्वे व ऋषिकेश काची या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

**'वसा वाचनाचा' या विषयावर व्याख्यान** –

दि. १५.१०.२०२२ रोजी मराठी विभाग व दै. पुढारीच्या वतीने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'वसा वाचनाचा' या विषयावर डॉ.संजय शिंदे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**स्वागत समारंभ -**

दि. १२.११.२०२२ रोजी मराठी विभागातील द्वितीय वर्ष मराठीचा विशेष स्तरावर अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. या निमित्ताने मराठी विभागातील द्वितीय, तृतीय व पदव्युत्तर स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी कु. तुषार गभाले याने सेट-नेटची तयारी कशी करावी? या संदर्भात मार्गदर्शन केले तर माजी विद्यार्थी श्री. अशोक सांडभोर यांनी 'मराठी भाषा आणि संधी' या विषयावर मार्गदर्शन केले.

**नेट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार**

दि. २०/११/२०२२ रोजी मराठी पदव्युत्तर विभागातील तुषार गभाले व प्रतीक्षा खराडे हे दोन विद्यार्थी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण झाले आहेत. यातील तुषार गभाले या विद्यार्थ्याला राष्ट्रीय स्तरावरील ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) जाहीर झाली. त्यांचा सत्कार संस्थाध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब व प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, की तुषार गभाले या विद्यार्थ्याने जेआरएफ शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळवलेले यश नक्कीच कौतुकास्पद असून मराठी विभागासोबतच महाविद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांसमोर त्याने आदर्श उभा केला आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:वर विश्वास ठेवून अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकिटी ठेवली आणि कठोर परिश्रम घेतले तर यश हमखास मिळते, असे सांगितले.

**डॉ. संदीप सांगळे यांचे व्याख्यान-**

दि. २९/१२/२०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ संदीप सांगळे यांचे यांचे 'साहित्य संशोधनाच्या विविध वाटा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**हस्ताक्षर स्पर्धा -**

दि. ३ जानेवारी २०२३ रोजी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त'हस्ताक्षर स्पर्धा ' आयोजित करण्यात आली.

**डॉ. शैलेश त्रिभुवन यांचे व्याख्यान-**

दि. ५/१/२०२३ रोजी 'सक्षम समीक्षा' या त्रैमासिकाचे संपादक डॉ. शैलेश त्रिभुवन यांचे यांचे 'नियतकालिक आणि साहित्य व्यवहार' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ. संजय शिंदे यांना पेटंट**

दि. ८/०१/२०२३ हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ संजय शिंदे यांच्यासह त्यांचे सहकारी डॉ प्रकाश शेवाळे, डॉ. कैलास महाले, डॉ. राजेंद्र थोरात यांना नुकतेच भारत सरकारकडून मराठी अक्षरलेखन सहाय्यक उपकरणाच्या डिझाईनचे पेटंट मिळाले आहे. मराठी विषयात महत्त्वाच्या व उपयोजनात्मक विषयावर रचनात्मक पेटंट तयार केल्याबद्दल डॉ. संजय शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांचे खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्रबंधक कैलास पाचारणे यांसह प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त डॉसुधाकर शेलार यांचे व्याख्यान -**

दि. १५/०१/२०२३ रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.सुधाकर शेलार यांचे 'उपयोजित व व्यावहारिक मराठीचे अभ्यासक्रमातील स्थान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, पाबळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर उपस्थित होते. मराठी विषयाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात उपयोजित व व्यावहारिक मराठीचा समावेश झाल्याने विद्यार्थ्यांना अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध झाल्या असून विद्यार्थ्यांनी

संबंधित भाषिक कौशल्य विकसित करावीत असे आवाहन मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ सुधाकर शेलार यांनी केले.

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ** –

दि. ५/२/२०२३ रोजी मा. खासदार श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील मराठी विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला मराठी विषयात पदवीला प्रथम आलेली कु. अलिशा मारूती रौंधळ आणि पदव्युत्तर स्तरावर प्रथम आलेली कु. आश्विनी चंद्रकांत ढोरे यांना डॉ संजय शिंदे आणि डॉ. बाळासाहेब अनुसे यांच्या वतीने४ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

**मराठी भाषा गौरव दिन** -

दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून काव्यवाचन, अभिवाचन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**भाषासूत्र विशेषांकाचे प्रकाशन-**

दि. २७/२/२०२३ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भाषासूत्र विशेषांकाचे प्रकाशन संस्थाध्यक्ष मा देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब व संस्था उपाध्यक्ष मा नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ.एस.एस. पिंगळे, डॉ. एच.एम.जरे उपस्थित होते. मराठी भाषेला दोन हजाराहून अधिक वर्षांचा समृद्ध वारसा असून ती फक्त भाषा नसून मराठी जणांसाठी जीवनपद्धती आहे.मराठी भाषा दिनाचा वार्षिक उत्सव साजरा करताना भाषिक अस्मितेसह वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

**जागतिक महिला दिन** -

दि. ५ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त जागर जाणिवांचा अभियान राबविण्यात आले. या अंतर्गत लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण,मुलींचा घटता जन्मदर, मुलगी शिकली : प्रगती झाली आणि उंच माझा झोका या विषयांवर प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**Online प्रश्नमंजुषेचे आयोजन-**

दि. ६ ते १० मार्च २०२३ दरम्यान जागतिक महिला दिनानिमित्त Online प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

**मा.अॅड. राजमाला बुट्टे पाटील यांचे व्याख्यान** -

दि. ८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त जागर जाणिवांचा अभियानांतर्गत राष्ट्रीय मानवाधिकार संघटना, पुणे च्या महिला सेल अध्यक्षा मा.अॅड. राजमाला बुट्टे पाटील यांचे लिंगभेद समानता(Gender Equality)या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, हिरामण सातकर पाटील प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे उपस्थित होते. या वेळी बोलताना मा.अॅड. राजमाला बुट्टे पाटील यांनी जागतिक महिला दिन हा स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा उत्सव असून विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वाला योग्य संधी देऊन स्वतःला सिद्ध करावे असे आवाहन केले. त्या पुढे म्हणाल्या की महिलांनी स्वतःचा आवाज न विसरता सुदृढ, सुशिक्षित, सुजान व स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करायला हवा. स्त्री व पुरुषांनी एकमेकांशी तुलना करण्यापेक्षा समानतेचा, आत्मभानाचा जागर करून पुढे वाटचाल केली तर तो खऱ्या अर्थाने माणूसपणाकडे घेऊन जाणारा मार्ग ठरेल असे त्यांनी सांगितले. उपस्थित विद्यार्थ्यांना स्त्री आत्मसन्मानाची शपथ देण्यात आली. अपेक्षा कर्वे व ज्ञानेश्वरी पावडे या विद्यार्थिनींनी स्त्रियांच्या सृजनशीलतेचा जागर केला.

**व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्य या अल्पकालीन अभ्यासक्रमाचे आयोजन -**

दि. २८/४/२०२३ ते १६/५/२३ दरम्यान मराठी विभागातील विद्यार्थ्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्य या अल्पकालीन अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**शुभेच्छा समारंभ-**

दि.१३.५.२०२३ रोजी मराठी विभागातील तृतीय वर्ष मराठीचा विशेष स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला. या प्रसंगी माजी विद्यार्थिनी मा. मयुरी भवारी (पुस्तकमैत्री बुक शॉप) यांनी मार्गदर्शन केले

**पीएच.डी. संशोधन केंद्र कामकाज –**

या शैक्षणिक वर्षात पीएच.डी. संशोधन केंद्राच्या माध्यमातून दि. १३/२/२०२३ रोजी पीएच.डी. प्रवेश मुलाखतीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समितीने कामकाज केले.

दि. १०/३/२०२३ - पीच.डी. संशोधन केंद्र नूतनीकरणासाठी सावित्रीबाई फुले पुणे समितीने कामकाज केले.

दि. २ मे २०२३ रोजी मराठी विभागातील पीच.डी. संशोधन केंद्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ समितीच्या माध्यमातून करण्यात आले

**पीएच.डी. संशोधन केंद्रात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ –**

मराठी विषयाच्या पीएच.डी. संशोधन केंद्रात मिलिंद महाजन, अमोल गोसावी, संदीप लांडगे, सुवर्णा पैलवान या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ दि. २ मे २०२३ रोजी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सुधाकर शेलार, डॉ. उपप्राचार्य व मराठी संशोधन केंद्र प्रमुख डॉ संजय शिंदे, प्रा.व्ही.बी.दौंडकर, डॉ. शिवाजी एंडाईत उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, महाविद्यालय व विद्यापीठ पातळीवरील पीएच.डी.साठीचे संशोधन केवळ पदवीसाठी न राहता समाजहितासाठी असावे. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात संशोधन केंद्र सुरू झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या संशोधन केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले

**इतर कामकाज :**

**ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) -**

दि. २०/११/२०२२ रोजी मराठी पदव्युत्तर विभागातील तुषार गभाले व प्रतीक्षा खराडे हे दोन विद्यार्थी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण झाले आहेत. या दोघांना राष्ट्रीय स्तरावरील ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) जाहीर झाली आहे.

**डॉ. संजय शिंदे यांना पेटंट**

दि. ८/०१/२०२३ डॉ. संजय शिंदे यांना भारत सरकारकडून मराठी अक्षरलेखन सहाय्यक उपकरणाच्या डिझाईनचे पेटंट मिळाले आहे.

**विभागीय ग्रंथालय**

मराठी विभागातील ग्रंथालयासाठी महाविद्यालयाच्या वतीने सुमारे २५ हजारांची पुस्तके घेण्यात आली तसेच तृतीय वर्ष मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांनी सुमारे ५ हजारांची पुस्तके विभागाला भेट दिली

**संशोधन कामकाज**

डॉ. संजय शिंदे यांचे२ शोधनिबंध प्रकाशित झाले.

**व्याख्यान**

डॉ. संजय शिंदे यांनी जिल्हा सत्र न्यायालय खेड सह आणखी३ ठिकाणी व्याख्यान दिले.

**इतर उपक्रम -**

या शैक्षणिक वर्षात द्वितीय व तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थ्यांचे सादरीकरण व गटचर्चा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. झूमवरOnline तासिका घेण्यात आल्या. डॉ. संजय शिंदे यांचे२ शोधनिबंध प्रकाशित झाले. तसेच त्यांनी जिल्हा सत्र न्यायालय खेड सह आणखी ३ ठिकाणी व्याख्यान दिले.

संस्थाध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील साहेब, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर आणि प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांच्यामार्गदर्शनाखाली मराठी विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कामकाज करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी संस्था व महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. एस.जे.पाचारणे आणि प्रा. पी.के.खराडे यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.